# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेतील वाहने/मशिनरीचे देखभाल व दुरूस्ती **{कारखाना विभाग}** अंतर्गत स्पेअरपार्ट खरेदी व दुरूस्ती तसेच टायर-टयुब, बॅटरी खरेदी, हार्डवेअर मटेरियल खरेदी करिता व्दिवार्षीक दरकरार करण्याच्या अनुषंगाने ई-निविदा मागविण्याच्या मान्यतेस, तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. २९१/वि.क्र.२६०, दि. ०२/०२/२०२२ अन्वये सध्या कार्यान्वित असलेल्या व्दिवार्षीक दरकरारास पुढील ४ माह पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- विस्तृत टिपणी नस्तित उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 903/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 11/07/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, कारखाना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेतील वाहने/मशिनरीचे देखभाल व दुरूस्ती अंतर्गत स्पेअरपार्ट खरेदी व दुरूस्ती तसेच टायर-टयुब, बॅटरी खरेदी, हार्डवेअर मटेरियल खरेदी करिता व्दिवार्षीक दरकरार करण्याच्या अनुषंगाने ई-निविदा मागविण्याच्या मान्यतेस, तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. २९१/वि.क्र.२६०, दि. ०२/०२/२०२२ अन्वये सध्या कार्यान्वित असलेल्या व्दिवार्षीक दरकरारास पुढील ४ माह पर्यंत मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.